॥ जय जय महाराष्ट्र माझा ॥

गायकः शाहीर साबळे आणि कोरस
गीतः राजा बढे

जय जय महाराष्ट्र माझा,
गरजा महाराष्ट्र माझा।

रेवा, वरदा, कृष्ण, कोयना,
यमुना, गोदावरी,
एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी।
भीमथडीच्या टट्टांनाया यमुनेचे पाणी पाजा
जय जय महाराष्ट्र माझा ॥ १ ॥

भिती न आम्हा तुझी मुळीही गडगडणार्या नभा
आसमानाच्या सुलतानीला जवाब देती जिभा।
सह्याद्रिचा सिव्ह गरजतो शिव शम्भू राजा
दरी दरीतून नाद धुंदला महाराष्ट्र माझा ॥ २ ॥

काळ्या छातीवरी कोरली अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती खेळ जीवघेणी।
दारिद्र्याच्या उन्हात शिजला,
निढळाच्या घामाने भिजला,
देश गौरवासाठी जिझला
दिल्लीचेही तख्त राखितो महाराष्ट्र माझा ॥ ३ ॥